# संदर्भ ग्रंथ सूचि


1 श्री तुकाराम महाराज गाथाभाष्य ह. भ. प.पै. शंकरमहाराज खंदारकर

भाग 1 पृष्ठ 30

2. श्री. तुकारामांचे निवडक अभंग –पिंगे श्री. म. आणि गजमलमाळी

3. श्री. तुकाराम महाराजगाथा भाष्य –

ह. भ. प.वै. शंकर महाराज खंदारकर

प्रस्तावना

# प्रकरण सातवे

## उपसंहार

# प्रकरण सातवे

# उपसंहार

धन्य म्हणविन  इहलोकी लोका ।
भाग्य आम्ही तुका देखियला ।।

आपल्या अभंगातील या अमर अक्षरात आपली अद्वितीयता  अनुभूतीने अक्षरबद्ध करून शब्दांकित साकारता साधणारे तुकाराम महाराज। तुकारामांचा जन्म हा समस्त मानवांचा भाग्योदयच महाराष्ट्राच्या मातीत, काळया जमिनींच्या भंडार भामगिरीच्या कुशीत घडलेल्या या  महामानवाने समस्त मानव जातीला जवळ करणारे पोटाशी धरणारे, सांत्वन देणारे, आश्वासन देणारे दिशा देणारे, धन्य जीवनाची साधना सांगणारे अभंगधन दिले असा हा महामानव पिढयांनपिढया मार्गदर्शकच राहणार आहे या महामानवावर दोन मोठया विद्वान लेखकांनी आपल्या लेखणीद्वारे जे साहीत्य लिहले  त्या साहित्याचा तौलनिक व चिकित्सक अभ्यास करताना मी सुद्धा तुकामय होवून गेले. तुकोबा समजावून घेण्यासाठी सुद्धा एक मोठी वैचारिक साहीत्यिक उंची लागते हे अगदी मनोमन पटले.

" तुकारामदर्शन" हे सदानंद मोरे यांचा ग्रंथ हा महाराष्ट्राच्या सांस्कृतिक इतिहासाची तुकाराम केंद्रीत पुर्नमांडणी असून अनेक विचारवंताच्या  विचारांची मांडणी ग्रंथात आहे. तुकारामांच्या जीवनातील तसेच इतिहासातील अत्यंत आरकावे मांडले गेले आहेत. तर विद्रोही तुकाराम या आ. ह. साळुंखे यांच्या ग्रंथात तुकारामांची जीवनविषयक भूमिका  मांडली आहे. दोन्ही ग्रंथ अभ्यासू' विचारवंताचे तत्वज्ञांनी लेखकांचे असून दोन्ही ग्रंथ पुढील पिढयांना मार्गदर्शक आहेत. अश्या ग्रंथाचा तौलनिक व चिकित्सक अभ्यास होणे गरजेचे आहे. विद्यापीठात असा दस्तऐवज असावा. एम्. फील  पदवीच्या निमित्ताने हा अभ्यास करावा असे वाटल्याने मी हा प्रबंध केला.

तुकारामांवर लिहल्या गेलेल्या दोन ग्रंथाचा तौलनिक व चिकित्सक अभ्यास पुढीलप्रमाणे प्रकरणानुसार केलेला आहे.

# प्रकरण पहिले

महाराष्ट्रातील संत परंपरेचा आढावा घेवुन त्यात असलेले संत तुकाराम महाराजांचे स्थान व त्यावेळच्या समाजाची पार्श्वभूमी महाराष्ट्राच्या सांस्कृतीक परंपरेत संताचे स्थान अत्यंत महत्वाचे आहे. शास्त्रीय शोधांच्या अभावी बाह्य सृष्टीवर प्रभूत्व गाजविण्याची उमेद जोपर्यंत मानवामध्ये नव्हती तोंपर्यंत त्याच्या व्यक्तिविकासाला आध्यात्मिक अधिष्ठानाची निःसंशय गरज होती. म्हणूनच ज्ञानेश्वरादिकांनी महाराष्ट्रातील लक्षावधी लोकांच्या निःसत्व जीवनक्रमला अध्यात्मज्ञानाची जोड मिळवून दिली. त्यामुळे त्यांना आपल्या दुःखाचा विसरच पडला नाही. त्यामुळे त्यांना आपल्या दुःखाचा विसर पडला नाही. तर आपल्यातील सुप्त शक्तिंची व भावनांची जाणीव झाली. पराभूतपणाची वृत्ति नाहीशी होवून प्रतिकूल परिस्थितीला कणखरपणाने तोंड देण्याची त्यांच्या मनाची तयारी झाली. नुसत्या नामसंकीर्तनाचा प्रचार करूनच संत थांबले नाहीत तर आपल्या आचरणाच्या व ग्रंथाच्या द्वारे अंतशुद्धी कर्तव्यनिष्ठा, भुतदया क्षमाशीलता परीपकार या दैवी गुणांची त्यांनी जोपासना केली. त्यांनी कर्मठपणाचे बंड मोडले पण कर्मप्रवृत्तिचा निषेध केला नाही. त्यांनी पढिकतेचा निषेध केला पण डोळसपणाचा आग्रह सोडला नाही.

तुकारामांनी आपल्या वाङ्मयाद्वारे समाजप्रबोधनाचे कार्य अगदी समाजाच्या सर्व थरांसाठी केले त्यांच्या वाङ्मयात आत्मप्रचितीचा ओलावा आहे. आणि मानवतेबद्दलची नितांत श्रद्धा आहे. ज्ञानेश्वरांनी महाराष्ट्राला तत्वज्ञान दिले, नामदेवांनी भक्तीची पताका फडकाविली. एकनाथांनी तत्व आणि तपशील, विचार आणि आचार यांचा मिलाफ घडवून आणला ज्ञानशिवाय भक्तीला डोळसपणा नाही, आचाराशिवाय तिच्यातील जडता नाहीशी होत नाही. परंतु या तिन्हीही प्रवृति एकवटुन त्यांची सामाजिक नीतीमत्तेत परिणीती झाल्याशिवाय मानवी जीवनाला पूर्णता नाही म्हणुन तुकारांमाची आपल्या अभंगातून समाजकंटकाची यथोचित संभावना करून चिरंतन नीतीमुल्यांची जोपासना केली, आणि ज्ञानेश्वरप्रणित भागवत धर्माच्या देवालयावर कळस चढविला.

# प्रकरण दुसरे

## तुकारामाच्या चरित्राची रूपरेषा

गृहस्थ तुकाराम, संत तुकाराम, कवि तुकाराम, विद्रोही तुकाराम, या चारही भूमिकांचा मिलाफ असणाऱ्या महापुरूषांच्या चरित्राचे थोडक्यात मांडलेले विवेचन.

तुकारामांचा जन्म इ.स. १६०८ मध्ये पुण्याजवळील देहू या गावात झाला त्यांचे संपुर्ण नाव तुकाराम बोल्होबा आंबिले असे आहे. त्यांचे घराणे प्रतिष्ठीत गणले जात होते. एका सत्वसंपन्न घरातल्या शुद्ध वातावरणात तुकोबा वाढले आचार आणि विचार यांची स्वच्छता हा त्यांच्या व्यक्तिमत्वाचा महनीय विशेष आहे.

तुकारामांचे सारे आयुष्य आणि काव्य हे त्यांनी केलेल्या अखंड संघर्षाचे प्रतिक आहे. शरणागती न पत्करणारी माणसे आपल्या बंडखोरीमुळेच बिकट वाटेने चालू लागतात एके दिवशी चारचौघांबरोबर पायाखालची वाट तुडवीत निघालेला हा आगळा माणुस एका नव्या खडतर वाटेने पावले टाकु लागला यातूनच तुकारामांचे व्यक्तित्व व साहीत्य वाढत गेले. लहान असलेला तुकाराम आपण आकाशाएवढे झालो आहोत अशी ग्वाही देऊ लागला त्यांचे सामान्यपण संपले. असामान्यत्वाच्या तेजाने त्यांचे व्यक्तित्व झळाळून उठले.

तुकारामांच्या संतत्वाला उपदेशाच्या अमृताने ओथंबली आहे. आजही इतकी वर्षे होवुनही तुकारामांचे अभंग लोकांच्या तोंडात आहेत. काळाबरोबर त्याचे महत्त्व ही वाढत आहे. असे चिरंतन वाङ्‌मय निर्माण करणाऱ्या चारही भूमिकांचा मिलाफ असणाऱ्या महापुरूषाच्या चरित्राचे विवेचन या प्रकरणात करताना तुकारामांवर अतिशय अन्याय झालाआहे हे जाणवते पुढच्या अनेक पिढयांना तुकारामांचे चरित्र मार्गदर्शक ठरणार आहे यात शंका नाही.

# प्रकरण तिसरे

तुकाराम दर्शन" या सदानंद मोरे यांनी लिहलेल्या पुस्तकाचे धावते समालोचन त्यामागील त्यांची भूमिका.

डॉ. सदानंद मोरे हे स्वतः तुकारामांच्या पिढीतील 10 वे वंशज आहेत. ते स्वतः पिढीजात वारकरी तत्वज्ञ आहेत त्यांनी मराठी भाषेच्या संस्कृतीचा वेध घेवून तुकोबांच्या जीवन दर्शनाद्वारे नवीनदृष्टी मांडली आहे त्याचा अभ्यास

बहुजन समाजातून आलेल्या आणि सूक्ष्म चिंतनाचे सामर्थ्य अंगी बिंबवलेल्या पिढीचा पथदर्शक अविष्कार म्हणजे या ग्रंथाचा लेखन व्यवहार. डॉ. मोरे यांचा हा ग्रंथ फार उच्च दर्जाचा आहे आणि महाराष्ट्रातील सर्व क्षेत्रातील सार्वजनिक कार्यकर्ते सामाजिक व सांस्कृतिक जीवनाविषयी ओढ असणारे सामान्य वाचक आणि इतकेच नव्हे तर शिक्षणाच्या सर्व पातळयावर कार्य करणारे अभ्यासक त्याची जाणतेपणाने दखल घेतील इतका हा ग्रंथ मोलाचा आहे. पुस्तक लिहिण्यामागे लेखकाची तीन उद्दिष्टे आहेत.

1. संतविषयक सर्वसाधारण गैरसमजाविषयी स्वतः तुकोबा या व्यक्तिविषयी अनेक चुकीच्या कल्पना रूढ आहेत. त्या दूर करून तुकोबांचे यथार्थ दर्शन घडविणे हे पहिले उद्दिष्ट.
2. महाराष्ट्राचे संस्कृतीपुरूष म्हणून तुकोबांचे वेगवेगळया कालखंडातील वेगवेगळया व्यक्तिंनी आणि सांस्कृतिक समूहांनी मुल्यमापन केले त्यातून तुकोबांचे दर्शन घडते. हे एकत्रितपणे प्रकट करणे हे दुसरे उद्दिष्ट.
3. संबंधित व्यक्ति वा समूहांना तुकोबा नेमके असेच का दिसले त्यामागील कार्यकारण भावाचा छडा लावणे हे तिसरे उद्दिष्ट.

या तिहेरी प्रकियेतून महाराष्ट्राचा सांस्कृतिक इतिहासाचा पट उलगडायला मदत होते ही सिध्दी पण लेखकाला मिळवायची होती.

अशा प्रकारे केलेल्या लेखनाचा अभ्यास प्रकरण तिसरे यामध्ये केला आहे.

# प्रकरण चौथे.

विद्रोही तुकाराम या ग्रंथाच्या निर्मिती मागची लेखकाने दिलेली भूमिका.

संत तुकारामावर आजपर्यंत अनेक प्रकारचे लेखन झाले भाषण भजन किर्तन इत्यादी माध्यमातून तुकारामांचे चरित्र व कार्य समाजापुढे मांडले गेले हे दर्शन वरवरचे व अपुरे आहे असे सर्वच विचारवंताना जाणवते. त्यांच्या ख–या व्यक्तित्वाची ओळख डॉ. आ. ह. साळुंखे यांनी विद्रोही तुकाराम या ग्रंथाद्वारे करून दिली आहे. तुकारामांचे परीवर्तनवादी विचार, उच्चवर्णीयांच्या अतिकमणाचा केलेला विचार याचा सांगोपांग अभ्यास या पुस्तकामुळे करावयास मिळतो त्याचा घेतलेला परामर्श.

" विद्रोही तुकाराम " या पुस्तकामध्ये समाजापासून अंधारात राहिलेला तुकाराम उजेडात आणला आहे.

इंद्रायणी नदीमध्ये कर्जखते बुडवणे ही तुकारामांच्या आयुष्यातील एक विलक्षण व असाधारण घटना आहे या घटनेची मराठी जगताने केलेली उपेक्षाही तितकीच विलक्षण असाधारण आणि धक्कादायक आहे. तुकारामांच्या जीवनातील खरेखोटे भलतेसलते चमत्कार तोंडपाठ करणा–या मराठी विश्वाने या अस्सल आणि अमोल कृतीची फारशी दखल घेतलेली नाही हे पाहीले की लेखकाचे मन अक्षरशः कळवळून उठते. अगदी कासाविस होवून जाते. अशा अनेक महत्वाच्या बाबी लेखकांनी विद्रोही तुकाराम मध्ये मांडल्या आहेत त्या भूमिकांचा परामर्श या प्रकरणात केला आहे.

# प्रकरण पाचवे

विद्रोही तुकाराम व तुकाराम दर्शन यांची तुलनात्मक मांडणी सदानंद मोरे यांनी " तुकाराम दर्शन " या पुस्तकाद्वारे महाराष्ट्रांच्या सर्व सांस्कृतिक परंपरेचा एक दमदार आणि त्याचवेळी एक सडेतोड असा वेध घेवून पुढची वाटचाल कशी करावी याचे स्पष्ट दिग्दर्शन तुकाराम महाराजांच्या जीवनकार्यातून केलेआहे. तुकारामांची सर्व बाजूने सांगोपांग ओळख त्यांनी या पुस्तकाद्वारे केली आहे. आ. ह. साळुंखे यांनी विद्रोह तुकाराम या आपल्या पुस्तकाद्वारे तुकारामांचे मूळ व्यक्तिमत्व समजावून देताना त्यांनी तुकारामावर आतापर्यंत झालेल्या अन्यायाचा तसेच तुकारामांवर आतापर्यंत झालेल्या विकृत लिखाणाचा आढावा घेतला असून सामाजिक न्यायासाठी लढलेल्या तुकारामांच्या जीवनातील सत्य उलगडण्याचा प्रयन्त इथे केलेला आहे.

आ. ह. साळुंखे यांची भाषा परखड आहे तर सदानंद मोरे यांची भाषा सौम्य आहे.

डॉ. मोरे यांचे लिखाण बहुश्रुत पंडिताचे आहे तर डॉ. साळुंखे यांचे लिखाण स्वंयप्रत तत्वचिंतकाचे आहे.

वेद म्हणजे भेद आहे हे म्हणण्याचे धाडस महात्मा फुले यांच्यात होते ती धाडसी वृत्ती आ. ह. साळुंखे यांचेकडे आहे सामोपचाराने संस्कृतीतील विसंगती दाखवून दयावी कोणालाही दु:खवू नये अशी कृती मोरे यांची आहे.

दोन्ही ग्रंथाचे परस्पर पूरक लेखन आहे. दोन्ही लेखकांचे एक समयावच्छेद घडवून आणण्याचे सामर्थ्य त्यांच्यात आहे हे अभ्यासातून सिद्ध होते.

# प्रकरण सहावे

## वाङ्‌मयीन मूल्यमापन

" तुकाराम दर्शन मध्ये सदानंद मोरे यांनी तुकारामांच्या सर्व अभ्यासकांचे मताचे संकलन केलेले आहे त्यांच्या मांडणीला एक सौंदर्य आहे. भाषा अभिरूची संपन्न आहे त्याचा अभ्यास. " विद्रोही तुकाराम" या ग्रथात आ. ह. साळुंखे यांचे स्वयंपुर्ण आणि स्वयंस्फूर्तअसे चिंतन आहे. वर्ग व वर्ण, सनातन संघर्ष यातील ताण या ग्रंथात आलेले आहेत.

" विद्रोही तुकाराम" व तुकाराम दर्शन तुकारामांच्या साहीत्याचे अंतरंग व त्या अंतरंगाची उकल करणारी ही दोन पुस्तके पहील्या पाच प्रकरणात अभ्यासल्यानंतर दोन्ही ग्रंथाच्या वाङ्‌मयाचे सौंदर्य आणि तुकारामांच्या अभंगाचे सौंदर्य या दोन्हीचा अभ्यास या प्रकरणात केला आहे.

तुकारामांचे इतके अभंग आहेत हे अभंग पूर्णपणे दोन्ही ग्रथांत म्हणजे विद्रोही तुकाराम व तुकाराम दर्शन यामध्ये मांडले गेले नव्हते पण या दोन्ही ग्रंथाच्या अनुषंगाने तुकारामांच्या काही अभंगाचा अभ्यास केला तो या प्रकरणात नमूद केला आहे. त्यातील वाङःमयीन सौदर्य मांडले आहे. दोन्ही ग्रंथाचेही वाङ्‌मयीन मुल्यमापन केले आहे. तुकाराम महाराज हे बर्हिमुखतेच्या उंबरटयावर बसून अंर्तमुख असणारी कविता लिहणारे कवी होते शब्दांच्या संदर्भात अत्यंत चोखंदळ आहेत. त्यांची रचनाही तशीच बंदिस्त आहे.

अश्या प्रकारे तुकारामांच्या जीवनाचा अभंगाचा त्याचबरोबर दोन्ही पुस्तकातील वाङ्‌मयाचे मुल्यमापन या प्रकरणात केले आहे.

# परिशिष्ट

# " तुकाराम दर्शन "

लेखक – सदानंद मोरे

तुकाराम महाराजांचे वंशज (दहाव्या पिढीतील)

तत्वज्ञ, विचारवंत, लेखक एम. ए. ( तत्वज्ञान) एम ए

( प्राचीनभारतीय संस्कृती आणि इतिहास )

पुणे विद्यापीठात तत्वज्ञानाचे प्राध्यापक ( पीएच. डी)

देहूकर मोरे घराण्यातून आधुनिक विद्येचे पहीले पदवीधर

साहीत्य समिक्षा तत्वज्ञान इतिहास या साऱ्या प्रांतामध्ये लेखन

महाराष्ट्राच्या सांस्कृतिक परंपरेचा अभ्यासक

वारकरीसाहीत्य परिषदेचे संस्थापक

आमची श्रीवाणी नियतकालीकाचे संपादक

विद्यापीट अनुदान मंडळाचे करियर ॲवार्ड

The Geeta A. Theory of Human Action

पी एच डी प्रंबधाला पुणे विद्यापीठाचा गुरवर्य रानडे दामले पुरस्कार

श्रीकृष्ण आणि वारकरी संप्रदायवरील

लिखाणाला डॉ. बाबासाहेब अंबेडकर ॲकॅडमीचा कै. रा. भि. जोशी पुरस्कार

# परिशिष्ट

# " विद्रोही तुकाराम "

लेखक आ. ह. साळुंखे

सांगली जिल्हयातील तासगाव तालुक्यातील खाडेवाडी नावाच्या एका छोटया खेडयातील एक शेतकरी कुटुंबात जन्म.

शिवाजी विद्यापीठाच्या वाङ्मय शाखेचे अधिष्ठाना ( Dean faculty of Arts)

संस्कृतचे अध्यापक, लाल बहादूर शास्त्री कॉलेज सातारा येथे (संस्कृत विभाग प्रमुख)

बी. ए. ला शिवाजी विद्यापीठात प्रथम श्रेणीत प्रथम

भारत सरकारची राष्ट्रीय शिष्यवृत्ती

एम. ए. ला शिवाजी विद्यापीटात संस्कृतमध्ये प्रथम श्रेणीत प्रथम

एम. ए (मराठी ), पीएच डी (संस्कृत) राष्ट्रभाषा ( हिंदी)

मराठी विश्वकोशात तुलनात्मक धर्मशास्त्र, संस्कृत इ. विषयांच्या अंतर्गत 100 हुन अधिक लेख

सामाजिक कृतज्ञता निधीचा डॉ. राम आपटे पुरस्कार

दोनदा महाराष्ट्र शासनाचा आंबेडकर पुरस्कार

शिवाजी विद्यापीठ व पंढरपूरचा कैकाडी महाराज मठ पुरस्कार

बीड येथील पिंगळे वाचनालयाचा पुरस्कार

मुंबईचा प्रियदर्शनी ॲकॅडमीचा पुरस्कार, मुकादम तात्या पुरस्कार

अमेरिकेतील महाराष्ट्र फांऊडशेनचा पुरस्कार

# संदर्भ सूची


| अ.नं. | पुस्तकाचे नाव व प्रकाशन | लेखकाचे नाव |
|---|---|---|
| 1. | विद्रोही तुकाराम ( गोपळ मोकाशी प्रकाशन ) प्रथम आवृत्ती 1997. | डॉ. आ. ह. साळुंखे |
| 2. | तुकाराम दर्शन ( गाज प्रकाशन आवृत्ती पहिली 1996) | डॉ. सदानंद मोरे |
| 3. | साक्षात्कारी संत तुकाराम (कॉन्टिटंल प्रकाशन पूणे आवृत्ती दुसरी ) | शं. दा. पेंडसे |
| 4. | श्री तुकाराम महाराज गाथा भाष्य (खंदारकर विश्वस्त संस्थेचे प्रकाशन 1999) | ह.भ.प.वै शंकरमहाराज खंदारकर भाग 1 व भाग 2 |
| 5. | संत वाङ्:मयाची सामाजिक फलश्रुती (महाराष्ट्र साहीत्य परिषद ) | शं. बा. सरदार |
| 6. | तुकाराम व्यक्तित्व आणि कवित्व ( प्रकाशन प्रकाश विश्वासराव लोकवाङ्:मय गृह आवृत्ती दुसरी ) | डॉ. किशोर सानप<br>प्रा. मनोज तायडे |
| 7. | संत तुकाराम व्यक्तित्व आणि कवित्व (मनोरमा प्रकाशन प्रथम आवृत्ती 1998 ) | डॉ. पुष्पलता शंकर शेटये |
| 8. | संत कवि तुकाराम एक चिंतन (मेहता प्रकाशन तृतीय आवृत्ती 1996) | डॉ. निर्मलकुमार फडकुले |
| 9. | कन्हेरी संदेश (प्रा सरल बाबर संपादक) | दीपावली अंक 1998 |
| 10. | श्री तुकाराम महाराज चरित्र ( एकनाथ महाराज आणि तुकाराम महाराज विशेषांक) | प्र. र. रा. गोसावी |
| 11. | पाच भक्तिसंप्रदाय | प्रा. र. रा. गोसावी |
| 12. | तुकारामाचे निवडक अभंग (व्हिनस प्रकाशन पूणे आवृत्ती तिसरी ) | पिंगे, श्री. म. आणि गजमळ माळी |

| अ.नं. | पुस्तकाचे नाव व प्रकाशन | लेखकाचे नाव |
|---|---|---|
| 13. | विचार भारती अंक 6 वा मार्च 2001 ( कार्यकारी संपादक डॉ. कन्हैया कुंदप ) . | |
| 14. | पाच संत कवि ( गणपती संस्थान प्रेस सांगली 1948) | डॉ. शं. गो. तुळपुळे |
| 15. | तुकाराम भक्तिचा डोंगोरा (अध्यात्मविद्यामंदीर ग्रंथमाला पुष्प 5 वे ) | ग. वि. तुळपुळे |
| 16. | संत श्रेष्ठ तुकाराम ( चरित्र व तत्वविवेचन ) | गुरूदेव रा. द. रानडे |
| 17. | तुकाराम अर्थात व्यवहार धर्म ( 1849) | दत्तात्रय विष्णु पारखे |